// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission for Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 2707
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक :- ममआ-२०२६/वीजवाहिनी/का-१/667
दिनांक :- ०७.१०.२०२६

## नोटीस

विषय :- आयोग कार्यालयातील मंजूर विद्युत भार Connected Loadवाढविणे, Circuit Breaker ची पाहणी करणे आणि वीज मीटर ते आयोग कार्यालय नवीन विद्युत वाहिनी टाकणेकरिता दरपत्रके मागविणेबाबत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयातील वीज मीटरपासून ते कार्यालयापर्यंतच्या विद्युत वाहिन्यांची प्राथमिक तपासणी म्हाडाच्या विद्युत विभागामार्फत करण्यात आली आहे.म्हाडाच्या पत्राच्या अहवालानुसार आयोग कार्यालयात नवीन विद्युत उपकरणांची जोडणी झाल्यामुळे सध्याचा विद्युत भार वाढलेला आहे. या अनुषंगाने आयोग कार्यालयातील विद्युत यंत्रणा सुरक्षित व सुरळीत रहावी, यासाठी खालील प्रमाणे शिफारशी म्हाडा कार्यालयामार्फत सुचविण्यात आल्या आहेत.

१. आयोग कार्यालयाच्या सध्याचा मंजूर विद्युत भार १० KW असून तो वाढूवन १५KW करण्यात यावा. तरी आपल्या कंपनीच्या नियमांनुसार १० KW वरुन १५KW भार वाढवून देण्याकरिता आवश्यक ती अधिकृत प्रक्रिया व कार्यवाही करण्यात यावी.
२. वीज वितरण कंपनीमार्फत बसविण्यात आलेल्या १००A क्षमतेच्या Circuit Breaker ची तांत्रिक तपासणी करण्यात यावी.
३. वीज मीटर ते आयोग कार्यालय नवीन विद्युत वाहिनी टाकण्यात यावी.
४. आयोग कार्यालयातील विद्युत भार R.Y. व B phase वर समान असणे आवश्यक आहे.
५. दरत्रकासोबत आयोग कार्यालयात प्रत्यक्षात येऊन तपासणी करून दरपत्रकासोबत तपासणी अहवाल (Inspection report) सादर करणे आवश्यक आहे.

सदर विद्युत कामाशी निगडित सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत असून इच्छूक असणा-या दरपत्रकधारकाने आपले दरपत्रक स्वत:च्या लेटरहेडवर आयोग कार्यालयास सादर करावीत. सदर दरपत्रकामध्ये रक्कम रुपये, G.S.T. नंबर लागूकर आकारणी स्वतंत्ररित्या दर्शविण्यात यावी.तसेच नोटीस संदर्भाचा पत्रात उल्लेख करणे आवश्यक आहे.

सदर दरपत्रके दिनांक १५.१०.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत आयोग कार्यालयास सिलबंद लिफाफ्यात सादर करावीत.सदर दरपत्रके त्याच दिवशी दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येतील.संबंधितांच्या अधिकृत प्रतिनिधींनी आयोग कार्यालयात उपस्थित रहावे. तरी सदर बाबतचा अंतीम निर्णय संपूर्णत: महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येत आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

(मा.सदस्य सचिव यांच्या मान्यतेने)

प्रशासकीय अधिकारी

ठिकाण :- वांद्रे, मुंबई